# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.09.2023** **वारःशनिवार**

1. नारी शक्ती वंदन अधिनियम सामान्य कायदा नाही तर नव्या भारताची नवी लोकशाही वचनबद्धता असल्याची पंतप्रधानांची भावना
2. भारतीय वैद्यकीय पदवीधर आता परदेशांमध्ये पदव्युत्तर शिक्षण आणि व्यवसाय करु शकणार
3. प्रामुख्यानं कोरोनापश्चात काळातील बदलत्या जीवनशैलीचा पुणेकरांच्या घरगुती गणेशोत्सवावर प्रभाव
4. चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात आणखी एक शेतकरी ठार आणि
5. पन्नास षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारताची ऑस्ट्रेलियावर आघाडी

**पंतप्रधान-नारीशक्ती**

नारी शक्ती वंदन अधिनियम सामान्य कायदा नाही तर नव्या भारताची नवी लोकशाही वचनबद्धता असल्याची भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. नवी दिल्लीतील भाजपा मुख्यालयात नारी शक्ती वंदन-अभिनंदन कार्यक्रमात कार्यकर्त्यांना काल संबोधित करताना मोदी यांनी संसदेत हे विधेयक मंजूर झाल्याबद्दल देशातील समस्त स्त्रीवर्गाचं अभिनंदन केलं. हा निर्णय येणाऱ्या पिढ्यांच्या स्मरणात राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संसदेची दोन्ही सभागृहं, सर्व राजकीय पक्ष, संसद सदस्यांनी संपूर्ण उत्साहानं हे ऐतिहासिक विधेयक मंजूर केल्याबद्दल त्यांनी आभार मानले. हे विधेयक मंजूर करण्यासाठी यापूर्वी प्रामाणिक प्रयत्न झाले नाहीत, त्याबद्दल केवळ बोललं जायचं असं सांगून पंतप्रधान म्हणाले की देशाला पुढे नेण्यासाठी संपूर्ण बहुमताचं बळकट, निर्णायक सरकार आवश्यक असल्याचं यातून सूचित होत आहे....

**महिला आरक्षण के लिए इतने दशकों से कोशिश तो हो रही थी। तीन-तीन दशक से बात हो रही थी। नहीं हो पा रहा था। आज ये संभव हुआ है। मैं जरा आपसे पूछना चाहता हूं ये संभव कैसे हो पाया। ये आपने किया है, करोडों देशवासियों ने किया है, और ये कैसे किया है उसका एक सबसे बडा कारण है देश की जनता ने, देश के मतदाताओं ने, विशेष करके मेरी माताओं बहनों ने, वोट देकर के एक पूर्ण बहुमत वाली मजबूत सरकार बनाई।**

**पंतप्रधान-वकील**

दोन दिवसांच्या आंतरराष्ट्रीय विधीज्ञ परिषदेचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत उद्घाटन होणार आहे. न्यायदान यंत्रणेतील उदयोन्मुख आव्हानं अशी या परिषदेची संकल्पना आहे. भारतीय विधीज्ञ संघटनेद्वारे प्रथमच ही परिषद आयोजित करण्यात येत असून कायदेविश्वातील प्रवाह, सीमापार खटल्यांमधील आव्हानं, कायदेविषयक तंत्रज्ञान, आणि पर्यावरणात्मक कायदा या विषयांवर त्यामध्ये मंथन होणार आहे. कायदेविषयक मुद्यांवर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सामंजस्य बळकट करण्याचा देखील या परिषदेचा उद्देश आहे.

**<u>आयुष्मान-भवः</u>**

आयुष्मान भव मोहिमेच्या अंतर्गत पहिल्या पाच दिवसात 51 हजारहून अधिक आयुष्मान मेळ्यांचं आयोजन करण्यात आल्याचं केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री भारती पवार यांनी काल नवी दिल्लीत बातमीदारांना सांगितलं. एकवीस लाखांहून अधिक लोकांनी या मेळ्यांमध्ये भाग घेतला, 55 लाख चाचण्या करण्यात आल्या तर चार हजार 700 हून अधिक शस्त्रक्रिया करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच पाच हजार 600 रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून 42 हजार बाटल्या रक्त संकलन करण्यात आलं. आयुष्मान भव मोहिमेखाली पाच दिवसांमध्ये आठ लाखांहून अधिक आयुष्मान कार्ड्स तयार करण्यात आली.

**<u>वैद्यकीय</u>**

भारतीय वैद्यकीय पदवीधर आता अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यासारख्या देशांमध्ये पदव्युत्तर शिक्षण आणि व्यवसाय करु शकणार आहेत. भारतीय राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाला विश्व वैद्यकीय शिक्षण संघाची दहा वर्षांसाठी मान्यता मिळाली आहे, त्यामुळं विद्यार्थ्यांना आता ही सुविधा मिळणार आहे. देशातील वर्तमान सर्व 706 वैद्यकीय महाविद्यालयं आता या संघाशी संलग्न होतील तर पुढील दहा वर्षांमध्ये स्थापित होणाऱ्या नवीन महाविद्यालयांना आपोआप ही संलग्नता मिळणार आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती देताना सांगितलं की या मान्यतेमुळं भारतीय वैद्यकीय महाविद्यालयं आणि तज्ज्ञांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेत वाढ होण्याची अपेक्षा आहे. तसंच वैद्यकीय शैक्षणिक सहयोग आणि देवाणघेवाण, निरंतर सुधारणा आणि नवोन्मेष यांना चालना मिळून गुणवत्ता हमीची संस्कृती बळकट होईल. परदेशी विद्यार्थी देखील वैद्यक शिकायला भारतात येऊ शकतील.

**<u>गौरीपूजन</u>**

संपूर्ण राज्यभरात ज्येष्ठा गौरींचं काल पारंपरिक पद्धतीनं पूजन करण्यात आलं. आज त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात येत आहे. याविषयीचा हा वृत्तांत...

**गणेशोत्सवाचा उत्साह द्विगुणीत करणारा सोहळा म्हणजे गौरीपूजन. गेल्या गुरुवारी ज्येष्ठा आणि कनिष्ठा गौरी सोनपावलांनी घराघरात प्रवेशल्या. काही घरांमध्ये परंपरागत शाडूच्या, पितळेच्या मुखवट्यांच्या स्वरूपात तर काही ठिकाणी सात खड्यांच्या रुपात विराजमान झालेल्या या महालक्ष्मी गौरींचं काल शास्त्रोक्त पूजन करण्यात आलं. वर्षातून एकदाच येणाऱ्या या माहेरवाशिणींना घराघरातल्या लक्ष्मींनी जरतारी साड्या नेसवून, आवडीचे दागिने घालून मनाजोगतं सजवलं होतं. काल गौरींना फराळ, विविध भाज्या, पुरणावरणाचा स्वयंपाक तर काही ठिकाणी आपापल्या परंपरेनुसार नैवेद्य दाखविण्यात आला. दिवसभर चैतन्यानं भारलेल्या वातावरणात घरोघरी हळदीकुंकू झालं, त्यानिमित्त माहेरच्या जिवलगांच्या भेटीगाठी झाल्या. पूर्वी या गौरींना लिंबलोण करून, घागरी फुंकत, झिम्माफुगड्या खेळत त्यांचं स्वागत केलं जायचं. त्यानिमित्तानं हजारो डोळे माहेरच्या वाटेकडे लागलेले असायचे. आता बदलत्या काळात आयुष्याच्या रामरगाड्यात हे चित्र काहीसं बदललं असलं तरी अंतरीची ओढ मात्र कमी झालेली नाही. अजूनही गौरींना सजवताना, पूजन करताना माहेरच्या आठवणींनी मनात कालवाकालव होते. सारे सोपस्कार निभावले तरी मनातलं माहेर साद घालत राहतं. आज या गौरींना भावपूर्ण निरोप देताना असंख्य गृहलक्ष्मींच्या डोळ्यांच्या कडा निश्चितच पाणावलेल्या असतील. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून स्वाती महाळंक.**

**<u>गणपती</u>**

प्रामुख्यानं कोरोनापश्चात् काळातील बदलत्या जीवनशैलीचा परिणाम पुणेकरांच्या घरगुती गणेशोत्सवावर दिसून आला असून अनेक घरातील गणपती बाप्पांच्या मुक्कामाचा कालावधी त्यामुळं कमी झाल्याचं आढळून आलं आहे. कोरोना काळात अनेकांच्या घरातील वयस्कर व्यक्ती आणि कर्त्या लोकांचं निधन झाल्यानंतर घरातील गणरायाचे सगळे सोपस्कार करणं जिकिरीचं बनलं. अनेकांच्या घरातील आई आणि वडील दोघेही नोकरदार असल्यानं घराकडे लक्ष देण्यास त्यांना फारसा वेळ उपलब्ध राहिलेला नाही. त्यामुळेच गेल्या दोन वर्षांपासून अनेकांच्या घरातील गणरायाच्या मुक्कामाचा कालावधी 10 दिवसांवरून 5 दिवस तर 5 दिवसांवरुन 3 दिवस आणि काही ठिकाणी तर अवघ्या दीड दिवसांवर येऊन ठेपला आहे. गणरायाची दैनंदिन पूजा, आरती आणि अन्य नित्योपचार करण्यास पुरेसा वेळ उपलब्ध नसल्यानं देखील अनेकांनी नाईलाजास्तव गणरायाला लवकर निरोप देण्याचा मार्ग निवडला आहे.

**<u>पुणे फेस्टिव्हल</u>**

पस्तिसाव्या पुणे फेस्टिव्हलचं उद्घाटन पर्यटनमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते काल करण्यात आलं. ज्येष्ठ अस्थिशल्य विशारद डॉक्टर के.एच.संचेती यांना जीवन गौरव पुरस्कार आणि उद्योगपती संजय घोडावत यांना पुणे फेस्टिव्हल पुरस्कारानं यावेळी सन्मानित करण्यात आलं. शतकपूर्ती वर्ष साजरं करणाऱ्या खडकमाळ आळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, श्री त्रिशुंड गणपती विजय मंडळ ट्रस्ट आणि सदाशिवपेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

फेस्टिवलची सुरुवात 50 कलाकारांनी केलेल्या शंखनादाने झाली. हेमा मालिनी आणि सहकलाकारांनी नृत्याद्वारे गणेश वंदना सादर केली. त्याचप्रमाणं विविध कलाकारांनी श्री गणेशासमोर आपली कला सादर केली.

**<u>पाऊस-बीड</u>**

बीड जिल्ह्यामध्ये आष्टी तालुक्यातील कडा आणि टाकळसिंग या दोन मंडळांमध्ये अतिवृष्टी झाल्याची नोंद जिल्हा प्रशासनाकडं काल करण्यात आली. गुरुवारी 24 तासात झालेल्या पावसामुळं जिल्हाभरातील अडचणीत येत असलेल्या शेती पिकांना आधार मिळाल्याचं समाधान शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

**<u>भूकंप-पालघर</u>**

पालघर जिल्ह्यातल्या पश्चिम किनारपट्टी भागात काल संध्याकाळी 3 पूर्णांक 8 रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाचा केंद्रबिंदू भूगर्भात 10 किलोमीटर खोलीवर असल्याची नोंद करण्यात आली आहे.

**<u>वाघ-चंद्रपूर</u>**

चंद्रपूर जिल्ह्याच्या मूल तालुक्यातील ताडाळा गावात शेतात काम करीत असताना एका शेतकऱ्याला वाघानं ठार केल्याची घटना काल घडली. पंचावन वर्षांचा हा शेतकरी आपल्या शेतात गेला असता दबा धरून बसलेल्या वाघानं हल्ला करून त्याला जागीच ठार केलं.

**क्रिकेट-पुल**

भारत-ऑस्ट्रेलिया दरम्यान पन्नास षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील काल मोहाली इथल्या पहिल्या सामन्यात भारतानं पाहुण्यांवर पाच गडी राखून विजय मिळवला. विजयासाठी 277 धावांचा पाठलाग करताना शुभमन गिलच्या 74 आणि रुतुराज गायकवाडच्या 71 धावांच्या बळावर भारतानं 8 चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. ऑस्ट्रेलियाचे पाच गडी बाद करणारा मोहम्मद शामी सामनावीर ठरला. पुढचा सामना उद्या इंदूर इथं होणार आहे.

**हवामान**

नाशिक शहरात गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू असल्यामुळं गंगापूर धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातील विविध भागात काल सायंकाळनंतर संततधार पाऊस पडला. सांगली शहरात जोरदार पावसानं रस्ते जलमय झाले. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.